
ISSN : 2454-7905
MAH/NAN/10936/2015
SJIF 2023 - Impact Factor : 8.024

Worldwide International
Inter Disciplinary Research Journal
(A Peer Reviewed)

Year - 9, Vol. I, Issue- LXXXVIII, 7 Oct. 2023

Social Status and Challenges of Women in Indian Society



Editor in Chief
Dr. Ramkishan N. Dahiphale
Principal
Mahila Kala Mahavidyalaya,
Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad).

Quartly Research Journal
(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

ISSN: 2454 – 7905

SJIF Impact Factor: 8 . 024

Worldwide International Inter Disciplinary Research Journal

A Peer Reviewed Referred Journal

Quarterly Research Journal

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

www.wiidrj.com

Vol. I ISSUE - LXXXVIII Year – 9 07 Oct. 2023

Janata Shikshan Prasarak Mandal's

MAHILA KALA MAHAVIDYALAY, AURANGABAD

(Shreemati Nathibai Damodar Thackersey Women's University, Mumbai)

Organized One Day Interdisciplinary National Conference

on

Social Status and Challenges of Women in Indian Society

:: Editor in Chief ::

Dr. Ramkishan N. Dahiphale

Principal

Mahila Kala Mahavidyalay, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad)

Address for Correspondence

Website: www.wiidrj.com

House No.624 – Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India – Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com / umbarkar.rajesh@yahoo.com

Mob. No: +91-9623979067

INDEX

Sr. No.	Title of the Paper	Name of Author	Page No.
01.	Problems and Challenges Faced by Indian Women at Workplace	Dr. Amruta S. Misal	01
02.	Indian Constitution and Women's Empowerment	Asst. Prof. Gaikwad R J	04
03.	Contribution of Indian Women in National Building	Vishakha Laxman Pandit / Ranvir	06
04.	Impact of Social Norms and Customs on Life of women in India: A Quantitative Study	Dr. Twinkle Sanghavi	11
05.	A study analyzing the impact of Psycho-Social Challenges on Well-being of Women in India	Dr. Tanu Sharma	17
06.	Representation Of Women In Indian Politics: Current Statistics, Challenges, And Way Forward	Ms. Trupti Vijay Jadhav	21
07.	Librarianship as a Profession for Indian Women: Navigating Challenges and Opportunities in the Traditional and Digital Era	Ms. Syeda Sarwat Farheen	25
08.	Status of Women and Challenges in Indian Society	Dr. Syeda Najeem Asra	30
09.	Indian Women: Status and challenges	Mrs. Suvarna H. Shinde	34
10.	A Critical Study of Feminist Perspective in Mahasweta Devi's "Breast Stories"	Sudhakar Jayram Kulkarni Manohar Purushottam Joshi	37
11.	Discrimination against Afro-American Women: A Study of Zora Neale Hurston's fiction	Dr. Shaikh Parvez Aslam	40
12.	Empowerment Of Women Through Agriculture	Dr. Savita G. Joshi	44
13.	Women Empowerment: in Different Services Sector of Development in India	Dr. Renuka D. Badvane (Bhavsar)	47
14.	Women Empowerment in the Works of Indian Writer in English Literature	Mrs. Rupali Kotanur Prof. Dr. M. P Joshi	50
15.	Contribution of Women Novelists in Indian English Literature	Mohammad Nasiruddin Bashiruddin	53
16.	Kamala Markandaya's Contribution In Indian English Literature	Dr. Manisha Vinayak Bhise	56
17.	Status and Challenges of Indian Women: A Comprehensive Analysis	Mane Sushama & Kure Shyam	59
18.	Women Entrepreneurs – A Key of Women Empowerment	Dr. Kotgire Manisha Arvind	61
19.	Contribution of Indian Women in Nation Building	Dr. Jasmeen Sameer Mujawar	65

20.	The Indian Women Writers and their Contribution in Indian English Literature: A Critical Study	Dr. Gangadhar Vithalrao Shinde	68
21.	The Status of Women in Indian Society After Independence	Dr. Vanita Sable - Chavan	71
22.	Role of Laws towards Protection of Women	Dr. Chaitanya A. Ghuge	75
23.	Status of women in rural areas of Maharashtra.	Dr. Bhise C. D.	79
24.	Socio-Eco Status & Challenges Of Women In Indian Society	Dr. Pallavi S. Bhavsar	82
25.	A study of Arundhati as a protagonist from Shashi Deshpande's novel Shadow Play	Ms. Ashwini M. Kshirsagar	85
26.	Confined Boundaries: A study of Geetanjali Shree's '*Ret Samaadhi*' (Tomb of Sand)	Dr. Abul Hasib Siddiqui	89
27.	Women's life depicted in Indian English Literature	Ms. Priyanka Suryagan	93
28.	विज्ञापनों में चित्रित महिला संसार: एक समाजशास्त्रीय विवेचन	डॉ. उषा किरण तिवारी	96
29.	राष्ट्र के निर्माण मे भारतीय महिलाओ की भूमिका	डॉ. बबीता बी. शुक्ला	100
30.	भारतीय नारी और हिंदी साहित्य	प्रा. डॉ. उत्तम जाधव	102
31.	महिला सशक्तिकरण	प्रा. तुकाराम पाराजी गावंडे	105
32.	समकालीन साहित्य : अस्मिता विमर्शों की विचारधारा	डॉ. दस्तगीर सरदारमियाँ देशमुख	108
33.	भारतीय महिलालेखिकाएं और हिन्दी साहित्य	डॉ. गीता संतोष यादव	113
34.	स्वतंत्रता संग्राम तथा राष्ट्र निर्माण में भारतीय महिलाओं का योगदान	प्रा. डॉ. सूर्यकांत शिंदे	117
35.	इक्कीसवीं सदी की चुनौतिया और भारतीय महिलाएँ	डॉ. सुरेखा लक्कस	121
36.	मृणाल पांडे के कथा साहित्य में राजनीतिक चुनौतियों से जूझती हुई नारी का विमर्श I	डॉ. संतोष बी. तमखाने	125
37.	मृदुला गर्ग का उपन्यास 'उसके हिस्से की धूप' में प्रेमी -प्रेमिका का संबंध चित्रण	डॉ. शेळके बी. टी.	128
38.	नासिरा शर्मा कृत उपन्यास 'ठीकरेकी मंगनी' में स्त्री अस्मिता	डॉ. शेख मोहसीन शेख रशीद	121
39.	वैधव्य जीवन संघर्ष की त्रासदी : 'रतिनाथ की चाची'	प्रा. डॉ. शेख मुखत्यार शेख वहाब	134
40.	डॉ. सूर्यबाला के कथा-साहित्य में नारी अंतर्द्वंद्व	वृषाली एस. बिम्बे	140
41.	विनोद बब्बर केसाहित्य मे स्त्री विमर्श	खान फेरोज अजीज प्रा. डॉ. दस्तगीर एस. देशमुख	142

42.	तसलिमा नसरीन के काव्य में महिलाओं की दशा एवं दिशा	प्रा. डॉ. रविंद्र आर. खरे	145
43.	नासिरा शर्मा के उपन्यासों में मुस्लिम परिदृश्य	डॉ. मिर्झा अनिसबेग रज्जाकबेग	149
44.	दहेज की समस्या : हिंदी साहित्यकारों (प्रेमचंद, चित्रामुद्गल और मैत्रेयी पुष्पा) के साहित्य में।	श्रीमती रमावती एस यादव	152
45.	चर्चा हमारा-स्त्री लेखन की चुनौतियाँ : मैत्रेयी पुष्पा	डॉ. परमेश्वर जिजाराव काकडे	156
46.	हिंदी साहित्यमें दलित स्त्री: दशा और दिशा	नाहिदा गुलाम दस्तगीर शेख	159
47.	नयी सदी की हिंदी कविता में चित्रित स्त्री जीवन	पवार प्रियंका विलास	163
48.	नारी सशक्तिकरण में महिलाओं की भूमिका	डॉ. सूर्यकांत माधवराव दळवे	166
49.	महिला सशक्तीकरण और भारतीय समाजसुधारक	डॉ. वर्षा प्रल्हाद गायगोले	168
50.	नारी विमर्श तथा उसका आधुनिक काल पर प्रभाव	स्वाती पांडुरंग खाडे डॉ. दत्तात्रय येडले	170
51.	व्यावसायिक क्षेत्रमें महिलाओं की भागीदारी – बदलते प्रतिदृश्य	डॉ. बीनू सिंह	173
52.	स्त्री स्वातंत्र्य व मराठा जातीतील विधवा महिलांच्या समस्या	सुचिता सुभाषराव ढोणे	177
53.	स्त्रियांचे स्वातंत्र्य जपणारे 18 कायदे -एक अभ्यास	प्रा. डॉ. रंजीता दत्तात्रय जाधव	181
54.	महिला विषयक कायदे	अश्विनी दिलीप डोळस	188
55.	समकालीन स्त्रियांचे साहित्य : गद्य लेखन	प्रा. निकिता शेंडगे डॉ. प्रताप गायकवाड	191
56.	थेरीगाथेतील आदर्श जीवनमूल्ये	डॉ. मोहन नाथा सौंदर्य डॉ. रेखा नारायण वाघ	193
57.	साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त मराठी कादंबरीमध्ये चित्रित झालेले स्त्री जीवन	सौ. सोनार सारिका ज्ञानेश्वर	195
58.	महिलांच्या विकासात उच्च शिक्षणाची भूमिका	सीमा गुलाबराव कदम डॉ. गजानन रामकृष्णराव मुधोळकर	198
59.	कामाच्या ठिकाणी महिलांच्या समस्या	सारिका देवराव हानवते	201
60.	मध्ययुगीन भारतातील कर्तबगार महिलांचे कार्य	प्रा. डॉ. साधना बी. जावळे	209
61.	वर्तमानकालीन भारतीय स्त्रियांचा दर्जा	डॉ. साईनाथ राधेशाम बनसोडे	212
62.	मोगल साम्राज्याची महिला प्रशासक -राणी नूरजहाँ	प्रा. डॉ. सय्यद मुजीब मुसा	215
63.	महिला सक्षमीकरण आणि शासकीय धोरण: एक अभ्यास	माधव चांदु वाघमारे	218
64.	थेरोगाथेतील स्वत्वाचा विचार : स्त्रीवादी दृष्टिकोनातून चिकित्सा	अंजली मधुकरराव भंडारे डॉ. के. एम. पवार	222
65.	महिला विषयक कायदे	डॉ. सय्यद आर. आर.	225
66.	ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विकसित करण्यात महिलांची भूमिका	श्री. संदेश बाबासाहेब घोडके डॉ. संजय लक्ष्मण भेदेकर	229

67.	लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातील 'स्त्रीचित्रण'	प्रा. संदीप परदेशी	236
68.	देशाच्या आर्थिक विकासात महिलांचा सहभाग	प्रा. मंगला गोरख पाटील डॉ. अविनाश आर. निकम	241
69.	महिला विषयक कायदे	मिनाक्षी मारोती अंभोरे प्रा. मधुकर हरी चाटसे	246
70.	पेशवेकालीन स्त्री जीवन	लेफ्ट. डॉ .पावडे खोब्राजी वामनराव	249
71.	शंकरराव खरात आणि बाबूराव बागूल यांच्या साहित्यातील स्त्रियांचा अभ्यास	मीनाक्षी पूनमचंद कुरील	252
72.	भारतीय राजकारणात महिलांचा वाढता सहभाग	डॉ. रमेश एकनाथ भारुडकर	256
73.	मराठी साहित्यातून चित्रित झालेले स्त्री जीवन	लहाने पंडीत नाना	259
74.	आधुनिक काळातील भारतातील महिलांची आर्थिक स्थिती आव्हाने	प्रा. रेणुका काशिनाथ पाटील	262
75.	वारकरी संत कवयित्री	डॉ. राम रौनेकर	267
76.	महिला आणि आरोग्य	राम नानाराव पारखे प्रा. डॉ. गजानन प्रा. जाधव	270
77.	आमदार सौभाग्यवती : स्त्रियांचे राजकारण	डॉ. मुक्ता निवृत्ती बिरादार	273
78.	मराठवाडा मुक्तिसंग्रामात महिलांचे योगदान	प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर	276
79.	भारतीय महिला अधिकार : मानवी हक्क आणि वास्वविकता	प्रा. गजानन भिकाजी फुलसावंगे	280
80.	भारतातील स्त्रियांची स्थिती आणि आव्हाने	सहा. प्रा. प्रकाश साहेबराव काळवणे	283
81.	महाराणी चिमणाबाई यांच्या सामाजिक सुधारणा	प्रा. जितेंद्र बाबुराव शेजवळ	286
82.	समाजसुधारकांचे स्त्री शिक्षण विषयक विचार व कार्य	सौ. शिला रघुनाथ कवडे	290
83.	मानवी हक्क आणि महिला सुरक्षा कायदे	प्रा. डॉ. कदम एच. पी.	295
84.	'काव्यफुले'तील सामाजिक कविता : एक अभ्यास	प्रा. डॉ. आशा सोपान गिरी	298
85.	महिलांचा राजकारणात वाढता सहभाग	आबासाहेब बालासाहेब हर्षे	302
86.	बौद्धकालीन स्त्रियांची सामाजिक स्थिती	डॉ. अशोक पांडुरंग सरवदे	307
87.	समकालीन मराठी लेखिकांचे कथालेखन	डॉ. अर्चना काटकर – सोनवणे	310
88.	स्वातंत्र्योत्तर काळातील राष्ट्र निर्मितीमधेय महिलांचे योगदान	डॉ. फारूकी मोहम्मद खय्युम मो. यूनुस	312
89.	संकल्पना चित्रण पध्दतीने मध्ययुगीन भारतातील कर्तबगार महिलांचे कार्य अभ्यासणे	श्रीमती वर्षा किरण सरोदे	317
90.	प्राचीन भारतातील महिलांची स्थिती व कार्य	पल्लवी दिनकर जमधाडे	322
91.	महाराणी ताराबाई चे मध्ययुगीन इतिहासातील स्थान	परसराम एकनाथ शेळके प्रा. डॉ. सुवर्ण भाऊसाहेब पाटील	325
92.	भारतीय समाजातील महिलांची स्थिती आणि आव्हाने	निता दादाजी मेश्राम	329

93.	महिला आणि मानव अधिकार	डॉ. नामानंद गौतम साठे	333
94.	ग्रामीण महिलांच्या आर्थिक समस्या व उपाययोजना	डॉ. नरसिगं भानुदास देशमुख	336
95.	महिला सबलीकरणात ग्रंथालयाची भूमिका	केंद्रे आरती रामचंद्र	340
96.	महिला सक्षमीकरण : कौटुंबिक व सामाजिक आव्हाने	प्रा. डॉ. नरसिंग आबासाहेब पवार	342
97.	महिलांचा राजकारणात वाढता सहभाग	डॉ. प्रविण बबनराव आहेर	345
98.	स्वातंत्र्यपूर्व काळातील ठुमरी गायिकांची वाटचाल	डॉ. दिपाली चंद्रकांत पांडे	348
99.	आधुनिक काळातील महिलांची सद्यस्थिती आणि आव्हाने	प्रा. डॉ. दत्तात्रय प्रभुराव मुंढे	352
100.	ग्रामीण महिलांचे आर्थिक सबलीकरण	प्रा. डॉ. जांगीड संगीता रामेश्वरलाल	355
101.	मध्ययुगीन भारतातील कर्तबगार महिलांचे कार्य	प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम	357
102.	ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणात शासकीय योजनांचे योगदान	प्रा. डॉ. चंद्रशेखर गित्ते	363
103.	राजकीय क्षेत्रात महिलांचे सबलीकरण	डॉ. जाधव व्ही. एम.	367
104.	भारतातील महिला विषयक कायदे	कुरे शाम माने सुषमा	369
105.	महिला आणि शारीरिक आरोग्य	डॉ. शेख मुसाभाई इमामभाई	373
106.	भारतीय राज्यघटना आणि महिला अधिकार	डॉ. जी. टी. मोकासरे	376
107.	देशाच्या आर्थिक विकासात महिलांचा सहभाग	प्रा. काकासो जे. अनपट प्रो. डॉ. जितेंद्र डी तलवारे	378
108.	स्त्रीयांची सामाजिक स्थिती	प्रा. अमोल निवृत्ती खरात प्रा. चंद्रकांत गोरक्षनाथ हारदे	381
109.	मध्ययुगीन भारतातील महिलांचे सामाजिक स्थिती	डॉ. अब्दुलसमद बादशाह शेख	383
110.	प्राचीन भारतातील महिलांची सामाजिक व राजकीय स्थिती	डॉ. अनंत मदन आवटी	386
111.	हैद्राबाद मुक्ती संग्रामात मराठवाड्यातील स्त्रियांचे योगदान	प्रा. डॉ. यशपाल भिंगे	392
112.	भारतीय समाजसुधारकांच्या साहित्यातून येणारे स्त्री प्रश्न व सुधारणा	प्रा. डॉ. रामकिशन दहिफळे	394
113.	कवी अविनाश पाटील यांच्या 'अनवट वाटा' कवितासंग्रहातून चित्रीत झालेले स्त्री जीवन	प्रा. डॉ. बालाजी विठ्ठलेराव डिगोळे	398
114.	मध्ययुगीन काळातील कर्तबगार महिला : माहूरगडची रायबागन	प्रा. डॉ. दत्ता उद्धव जाधव	410
115.	महिलां उद्योजिकाचा आर्थिक विकास व सबलीकरण	डॉ. सय्यद तनवीर बदरू द्दीन	413
116.	महिलांचा राजकारणात वाढता सहभाग	सोनल दादाराव भोजने	416
117.	भारतीय समाजातील महिलांची स्थिती आणि आव्हाने	छाया शिवाजी सौंदरमल डॉ. एम. के. सवई	418

118.	मराठी साहित्यातून चित्रित झालेले स्त्री जीवन	श्रीमती सविता अनिल वायळ	422
119.	महिला सबलीकरणाचे महत्त्व	प्रा. मिलिंद शत्रुघ्न ठोकळे	426
120.	हिंदू संस्कृतीचा वंचित घटक : देवदासी	प्रा कविता मुनेशवार	431
121.	स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्रातील स्त्री चित्रकर्त्यांचे कलाक्षेत्रातील योगदान	डॉ. राजेत्री कुलकर्णी	437
122.	बहिणाबाई चौधरीच्या कवितेतील पर्यावरण	प्रा. डॉ. म. ई. तंगावार	441
123.	स्त्रियांच्या सशक्तीकरणाकरिता भारतीय शासनाच्या योजना	अमिता महातळे (विरूटकर)	443
124.	स्त्रियांच्या प्रवासवर्णनातून चित्रित झालेले स्त्री जीवन	डॉ. मनिषा दादाभाऊ औटी	446

मध्ययुगीन भारतातील कर्तबगार महिलांचे कार्य

प्रा. डॉ.चांगुणा विठ्ठल कदम
इतिहास विभाग, बी.डी.काळे महाविद्यालय, पोंदेगाव ता.आंबेगाव, जि.पुणे.

प्रस्तावीक -

स्त्रीला मिळालेले दुय्यम स्थान हे जगभराच्या इतिहासाचा एक भाग मानले जाते. तिच्या या दुय्यम स्थानाचे मूळ आपणास पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत प्रामुख्याने पहावयास मिळते. स्त्रीच्या तुलनेने पुरुष हाच श्रेष्ठ असे अशी या व्यवस्थेची धारणा असते. या पार्श्वभूमीवर कोणत्याही समाजात स्त्रियांना सामान्यत: कोणते हक्क किंवा अधिकार उपलब्ध असतात, त्यांनी कोणती कर्तव्य पार पाडली पाहिजेत असे त्यांच्यावर बंधन असते आणि हे हक्क व कर्तव्य त्यांच्याकडून कशा रीतीने कार्यान्वित होतात या बाबींवर त्या समाजातील स्त्रियांचा दर्जा अवलंबून असतो. त्या संबंधाने स्त्री जीवनावर महत्त्वपूर्ण प्रभाव टाकणाऱ्या संस्थेमध्ये कुटुंब व नातेदारी व्यवस्था, विवाह संस्था आणि धार्मिक परंपरा इत्यादीचा प्रामुख्याने समावेश होतो. या दृष्टिकोनातून कोणत्याही कालखंडातील समाजमनाने आपल्या वेळच्या स्त्रीला दिलेले स्थान विचारात घेणे आवश्यक वाटते.

जेव्हा एका देशाच्या संस्कृतीवर दुसऱ्या देशाच्या संस्कृतीचा प्रभाव पडतो तेव्हा तेथील मूळ संस्कृतीमध्ये परिवर्तन घडून येणे स्वाभाविक ठरते. इसवी सन ७१२ मध्ये मोहम्मद बिन कासीमने भारतावर पहिले आक्रमण केले. इसवी सन १२०० नंतर लवकरच मुसलमान राज्यकर्ते म्हणून भारतात आले. त्यांच्या प्रभावी इस्लाम धर्माच्या प्रवेशाने हिंदू व मुस्लिम संस्कृतीत एक नवीन संघर्ष निर्माण झाला. परकीयांचे अत्याचार, धर्मांतरण यामुळे एकंदरीतच तत्कालिन सामाजिक परिस्थितीवर दूरगामी परिणाम झाले. विशेषत: स्त्रियांचे समाजातील स्थान अत्यंत हीन दर्जास पोहोचले. सामान्यत: इसवी सन १२०० पासून इसवी सन १८०० पर्यंतचा काळ म्हणजे दिल्लीत मुसलमान राज्यकर्ते झाले तेव्हापासून ते पेशवाई अखेरपर्यंतचा काळ भारतीय इतिहासात मध्ययुगीन कालखंड म्हणून गणला जातो.

प्रस्तुत शोधनिबंधात स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या परिप्रेक्ष्यातून सुलतानशाही, मुघल व मराठा कालखंडातील कर्तबगार महिलांच्या कार्याची मांडणी केलेली आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे -

१) मध्ययुगीन भारतातील स्त्री जीवनाचा अभ्यास करणे.

२) सुलतानशाही, मुघल व मराठा कालखंडातील कर्तबगार महिलांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेणे.

शोधनिबंधाची गृहितके -

१) मध्ययुगीन भारतातील सामाजिक जीवन संमिश्र स्वरूपाचे होते.

२) मध्ययुगीन भारतातील स्त्री जीवन दयनीय स्वरूपाचे होते.

३) मध्ययुगीन काळात राजघराण्यातील स्त्रियांनी राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रात भरीव योगदान दिले.

संशोधन पद्धती -

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

सुलतानशाही कालखंडातील स्त्री जीवन -

इसवी सनाच्या ११ व्या शतकात मुसलमानांनी भारतावर स्वारी केली. या काळातील गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद आणि लोदी या राज्यकर्त्या घराण्यांपैकी सय्यद, लोदी व सूर ही घराणी सोडली तर बाकीचे सर्व राजे तुर्क अगर मुघलवंशीय होते. या राजांनी भारतात आपल्या मध्य अशियातील भटक्या पूर्वजांचे अनेक रूढी

विशेष आणले. या भटक्या जमातीत स्त्रियांची स्वतंत्र राहणी अशक्यच असे. कारण त्यांच्या दृष्टीने स्त्रिया म्हणजे समाजाचा पवित्र ठेवा, याचा नीट सांभाळ करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्यांची चरित्रे कितीही उदात्त असली तरी प्रदर्शनीय नसतात. त्यांचे कर्तृत्व हे त्यांच्या नातेवाईकांच्या लाभापुरतेच मर्यादित असते. अशी तत्कालीन समाजाची समजूत होती.

मध्ययुगात प्रत्येक गोष्टीकडे धार्मिक दृष्टिकोनातून पाहिले जात होते. त्याचा प्रभाव राजकीय तत्त्वज्ञान आणि शिक्षणावरही दिसून येत होता. मध्ययुगीन भारतात हिंदू व मुस्लिम स्त्री शिक्षणास उत्तेजन दिले गेले नाही. पडदा पद्धतीतील काटेकोरपणामुळे स्त्री शिक्षण अशक्य झाले होते. त्या काळात मुलींसाठी वेगळ्या शाळा नसल्यामुळे त्या घरीच आई-वडील किंवा पतीकडून शिक्षण घेत. मुस्लिम मुली प्राथमिक धडे वाल्यावस्थेत मुलांबरोबर घेत. त्यांना कुराणाचे शिक्षण दिले जात असे. वयात आल्यावर मात्र त्या मुलांबरोबर शिकत शिकत नसत. स्त्रीशिक्षण बहुतेक कुटुंबाची आर्थिक स्थिती आणि वर्गाच्या आधारावर अवलंबून होते. खेड्यात स्त्रिया शेतावर काम करीत असल्याने त्यांचे शिक्षण अशक्य होते. याउलट उच्च वर्गातील स्त्रिया शिक्षित व कुशल असत. मीराबाई, राणी रूपमती, पद्मावती इत्यादी हिंदू विदुषी स्त्रिया आढळून येत होत्या स्त्रिया नृत्य, संगीत चित्रकलेतही दक्ष असत. या कालावधीत हिंदू समाजातील स्त्रियांच्या परिस्थितीत फारसे बदल घडवून आले नाहीत. मुलींचे बालवयात विवाह करणे,पत्नीने पतीची निष्ठेने सेवा करणे या जुन्या बाबी तशाच पुढे चालू राहिल्या. परंतु परित्याग, संसर्गजन्य अथवा असाध्य व्याधी इत्यादी विशेष परिस्थितीत घटस्फोट मान्य करण्यात येत असे. विशेषतः राजघराणे, सरदार व उच्चवर्गीय घराण्यात बहुपत्नीत्वाची पद्धत रुढ होती. मध्ययुगात पडदा पद्धती प्रचलित होती. त्याकाळी भारतात आलेल्या कित्येक प्रवाशांनी देशाच्या निरनिराळ्या भागात सतीची प्रथा प्रचलित असल्याचे उल्लेख केलेले आहेत, उदाहरणार्थ इब्न बतूताने सती प्रथेबाबत नोंदविलेले निरीक्षण असे की, "एक स्त्री ढोल ताशांच्या प्रचंड आवाजात आपल्या पतीच्या चितेवर स्वतःला जिवंतपणी जाळून घेत असल्याचे वर्णन केलेले आहे."[१]

सुलतानशाही कालखंडातील कर्तबगार महिलांचे कार्य -

सुलतानशाही काळात स्त्री-पुरुषात स्वतंत्रपणे सामाजिक व्यवहार होत नसे. उच्च व मध्यमवर्गीय स्त्रियांना नृत्य व संगीतात मौजमजा करण्यावर प्रतिबंध होते. तथापि शाही घराण्यातील व अभिजन वर्गातील काही स्त्रियांनी राजकीय सत्तेचा वापर केल्याचे मात्र दिसून येते. उदाहरणार्थ अल्तमशनंतर रुकनुद्दीन फिरोजला सत्ता प्राप्त करून देण्यात त्याची आई शाहतुर्कनचा प्रभाव होता. सुलतानशाही कालखंडातील कर्तबगार महिला प्रशासक म्हणजे रझिया सुलतान होय. रझिया सुलतानने रुकनुद्दीन फिरोजची गादी समाप्त केली. रझिया ही मध्ययुगीन काळात दिल्लीच्या सिंहासनावर आरुढ झालेली एकमेव मुस्लिम महिला होती. राज्यकर्ती म्हणून कारभार करत असताना रझिया सुलतानला अनेक बंडांना तोंड द्यावे लागले. परंतु शौर्य आणि मुत्सद्देगिरीच्या जोरावर रझियाने सर्व विरोधकांची बंडे हाणून पाडली व दिल्ली सुलतानशाहीवर आपले स्वामित्व प्रस्थापित केले. युद्धामध्ये स्वतः रझिया सुलतान आपल्या सेनेचे नेतृत्व करत असे. रजपुतांना काबूत आणण्यासाठी रझियाने रणथंभोरच्या विरुद्ध युद्ध मोहीम आखली होती. तिच्या संपूर्ण राज्यात तिने उत्तम कानून व्यवस्था प्रस्थापित केली होती. रझिया सुलतानने दरबारातील सर्व सरदारांना विश्वासात घेऊन हिंदूंवरील जिझिया कर रद्द केला होता.रझिया सुलतानने राज्यकारभार सुरू केला त्यावेळी तिला तुर्की अमिरांच्या कोणत्याही मोठ्या गटांनी पाठिंबा दिलेला नव्हता. तरीही तिने आपले राज्य टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने शत्रू गटाला एकत्र येऊ दिले नाही. बदायून, मुलतान, लाहोर व हंसी येथील अमिरांनी प्रारंभी रझियाला विरोध केला होता. परंतु तिने आपल्या राजनैतिक कौशल्याचा वापर करीत वरील ठिकाणांच्या काही बड्या अमीरांच्या गटाला आपल्या बाजूस वळवून घेऊन आपली सत्ता स्थिर झाल्यानंतर प्रशासनाची पुनर्रचना करण्यास सुरुवात केली.

रझिया स्त्री वेशभूषेऐवजी पुरुषी वेशभूषा धारण करून प्रत्यक्ष दरबारात उपस्थित राहत असे. चेहरा न झाकता ती हत्तीवरून फिरत असे. घोड्यावर स्वार होऊन लढाई करत असे. शिकार करत असे. रस्त्यांची व्यवस्था,

भारतीची डागडूजी करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था इत्यादी तिच्या महत्त्वाच्या सुधारणा होत्या. तिने शासनात शिस्त निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आपल्या नावाने नाणी पाडली. नाण्यांवर उम्दत-उल-निस्वा अशी मुद्रा कोरलेली असे. रझिया सुलतानने जवळजवळ चार वर्षे दिल्लीवरून केलेला राज्यकारभार महत्त्वाचा होता. सुलतानशाहीच्या काळात राज्य करणारी रझिया ही पहिली आणि शेवटची स्त्री ठरली. तबकात - ए - नासिरी या ग्रंथाचा लेखक मिन्हाज उस सिराज रझियाची स्तुती करताना लिहितो की, "ती अतिशय बुद्धिमान, विचारी, उदार, न्यायाहितदक्ष, न्यायप्रिय, प्रजेवर प्रेम करणारी व एक महान योद्धा होती."[२]

गो.स. सरदेसाईंच्या मते, "वास्तविक राज्य चालविण्यास रझिया समर्थ होती. परंतु एका स्त्रीने राज्य करावे ही कल्पना तुर्की लोकांना सहन झाली नाही. याच कारणाने रझियाचे पतन झाले."[३] याशिवाय सुलतानशाही काळात सुलतान कैकुवादवर मलिक निजामुद्दीनच्या पत्नीचा मोठा प्रभाव होता. त्याने सुलतानाच्या 'हरेम'ला आपल्या नियंत्रणाखाली आणल्याचा उल्लेख डॉ. चिटणीस यांनी केलेला आहे.

मुघल कालखंडातील स्त्री जीवन –

मध्ययुगातील दुसरा कालखंड (१५२६- १७०७) हा मुघल बादशाहीचा काळ मानला जातो. मुघलकालीन समाज संमिश्र स्वरूपाचा होता. मुसलमान समाजात तुर्क, अफगाण, इराणी इत्यादी बाहेरून येऊन स्थायिक झालेले लोक आणि भारतातील धर्मांतरित मुसलमान यांचा समावेश होत असे. मुघल काळात सत्तारूढ वर्ग, श्रीमंत वर्ग, जहागीर, शेतकरी, गुलाम वर्ग असे विविध वर्ग असून त्यांचे पोटविभागही होते. अमीर उमरावांचा वरिष्ठ वर्ग वैभव संपन्न जीवन जगत होता तर सामान्य वर्गाचे जीवन कष्टप्रद होते. मुघल कालखंडात स्त्रियांची स्थिती दयनीय स्वरूपाची होती. बहुपत्नीत्वाची चाल व पडदा पद्धत रुढ होती. हिंदू समाजात कन्यावध, बालविवाह, सती इत्यादी प्रथा होत्या. हुंड्याची प्रथा अस्तित्वात होती. या काळात कुराणाचे संपूर्ण ज्ञान असणे महत्त्वाचे होते. मुघल राजकन्यांना महालात शिक्षण देण्याची व्यवस्था केली जात असे. या कार्यासाठी साहित्यात निपुण असणाऱ्या शिक्षिका किंवा वृद्ध शिक्षक यांची नियुक्ती केली जात असे. मुघल स्त्रियांसाठी तुर्की भाषेचा वापर दैनंदिन जीवनात होत असे. तर हिंदू स्त्रिया हिंदू व इतर प्रादेशिक भाषांचा वापर करीत असत. अकबराने राजकन्यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले होते. त्यांना लिहिणे, वाचणे शिकविले जात होते. मुघल काळात राजघराण्यातील स्त्रियांना गद्य, पद्य, सामाजिक शास्त्रे, धर्मशास्त्र, फारसी व अरबी भाषांचे शिक्षण दिले जात असे. या स्त्रिया केवळ सुशिक्षितच नव्हत्या तर त्यांनी साहित्य क्षेत्रातही प्रगती केलेली दिसते. बाबराची आई कुतलक - निगार खानम तुर्की व फारसी भाषेत सुशिक्षित होती. गुलबदन बेगमने लिहिलेले हुमायूननामा या कालखंडातील उत्तम चरित्राचा नमुना मानला जातो. अकबराची आई हमीदा बानू बेगम इत्यादी सर्व सुशिक्षित स्त्रिया होत्या. सम्राज्ञी नूरजहान घोडेस्वारी, शिकारी, भरतकाम इत्यादीं बरोबरच त्यावेळची एक उच्च सुसंस्कृत स्त्री होती. मुमताज महलचे फारसी भाषेवर प्रभुत्व होते. औरंगजेबाची मुलगी झिबुन्नीसाला चांगले शिक्षण मिळालेले होते. ती या काळातील एक प्रसिद्ध कवयित्री होती.

मुघल कालखंडातील कर्तबगार महिलांचे कार्य -

मुघल काळात स्त्रियांनी शासन व्यवस्था व राजकीय क्षेत्रात आपले योगदान दिले. हुमायूनच्या आईने मीर बाबाने रचलेला कट आपल्या पराकाष्ठेचा प्रभाव वापरून उलटवला आणि आपल्या मुलासाठी गादीचे संरक्षण केले. अकबराची आई दाई माहम अगनाने राज्यावर आपले प्रभुत्व स्थापन केले. मुघलकाळात जहांगीरची पत्नी नूरजहान एक प्रभावी व्यक्तिमत्त्वाची स्त्री होती. तिने अकरा वर्षे सत्ता आपल्या हातात ठेवून प्रतिस्पर्ध्यांच्या सत्काराचे स्थानांना हाणून पाडले. मुघल साम्राज्यातील त्या काळातील सर्वात शक्तिशाली महिला असण्याचा मान नूरजहाने मिळवलेला होता. नूरजहानच्या कारकिर्दीची नोंद मध्ययुगीन भारताच्या इतिहासात गौरवाने घेतली जाते. जन्माच्या वेळी तिचे नाव मिन्ह - उन - निसा होते. नंतर तिचे नाव नूरजहा म्हणजे जगाला प्रकाशमान करणारी असे नाव तिच्या पतीने मुघल बादशहा जहांगीरने ठेवले. ती कवयित्री होती. उत्तम शिकारी होती आणि कलात्मक वास्तूविशारद होती. मुघल साम्राज्याची सहप्रशासक होती. शिकार असो, राजकीय आदेश असो, सार्वजनिक

इमारतींची रचना असो, गरिब आणि मागासलेल्या स्त्रियांना आधार देणे असो, त्या काळच्या स्त्रियांच्या कल्पनेपलीकडील आयुष्य नूरजहान जगली होती. जेव्हा राजाचं अपहरण झालं तेव्हा तिने सैन्याचे नेतृत्वही केले. तिच्या धैर्यामुळे तिनं नाव समाजात आणि इतिहासात कायमचे कोरले गेले आहे.

नूरजहान बाबतचे एक वेगळे वर्णन मोहम्मद यासीन लेखकाने 'सोशल हिस्टरी ऑफ इस्लामिक इंडिया' या ग्रंथात केले आहे. तो म्हणतो, "नूरजहान प्रेमळ, पतीव्रता, पतिप्रिय, सांसारिक, काटकसरी, अनाथांची आश्रयदात्री, स्त्रियांचे नेतृत्व करणारी या सर्व संपन्न गुणांमुळे ती एक आदर्श स्त्रियांचे प्रतीक बनली आहे."[४]

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात आपल्या पराक्रमाने प्रसिद्ध झालेली एक शूर महिला म्हणजे चांदबीबी होय. 16 व्या शतकाच्या उत्तरार्धात चांदबीबीने स्त्री असूनही पुरुषार्थ गाजवून आपले नाव इतिहासात अजरामर केले. अली आदिलशहाच्या मृत्यूनंतर राज्यकारभाराची सर्व जबाबदारी चांदबीबीकडे आली. इब्राहिम आदिलशहाच्या वतीने चांदबीबी राज्यकारभार पाहू लागली होती. राज्यकारभार करीत असताना तिने माणसांची पारख करून योग्य जबाबदाऱ्या दिल्या. इब्राहिम आदिलशहाचे शिक्षण आणि राज्यातील सुधारणा आणि संरक्षण याकडे तिने कटाक्षाने लक्ष दिले होते. अहमदनगरवरील वेढा उठविण्यात चांदबीबीने मोलाचे योगदान दिले.चांदबीबी ही राजकारणात कुशल होतीच मात्र तिचे अरबी, फारसी या परकीय आणि दक्षिण भारतातील स्थानिक भाषांवरही प्रभुत होते. परदेशातील हुशार व्यक्तींना आश्रय देऊन त्यांच्याकडून राज्याचा फायदा करून घेण्यातही ती कुशल होती. त्यामुळे मध्ययुगीन भारताच्या इतिहासात चांदबीबीचे नाव आवर्जून घेतले जाते. या काळात स्त्रियांना निम्न दर्जा होता असे दिसते. ज्यावेळी मध्ययुगीन अरबी प्रदेशात स्त्रिया समाज व राजकारणात मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्याचा उपभोग घेत होत्या. त्यावेळी भारतातील मुस्लिम स्त्रियांना समाजातील कनिष्ठ दर्जामध्ये समाधान मानावे लागत होते. स्त्री जीवन बहुविवाह पद्धती, विधवा पुनर्विवाह, पडदा पद्धती इत्यादींनी ग्रासलेले होते. डॉ. वाहिदच्या मते, "मध्ययुगात भारताच्या बाहेर मुस्लिम देश पडदा पद्धतीशी पूर्णपणे अपरिचित होते"[५]

मराठा कालखंडातील स्त्री जीवन -

मराठेकालीन स्त्रियांची स्थिती त्या वेळच्या दक्षिण भारतातील इतर भागातील स्त्रियांप्रमाणेच होती. तिच्यावर सर्व प्रकारची सामाजिक बंधने असून सामाजिक स्वातंत्र्य नव्हते. बालविवाह पद्धती, सती पध्दती, हुंडा पद्धतीला स्त्रियांना तोंड द्यावे लागत होते. बहुविवाह पद्धतीने स्त्रीचे समाजातील स्थान दुय्यम दर्जाचे केलेले होते. त्यामुळे मध्य महाराष्ट्रातील स्त्री जीवनाचे वैशिष्ट्य म्हणजे परावलंबन, काबाडकष्ट व अपमानाचे जीवन होय.

मराठा कालखंडात पितृसत्ताक एकत्र कुटुंब पद्धती हा समाजरचनेचा गाभा होता. या कालखंडातील स्त्रियांची सामाजिक रूढीतून मुक्तता झाली होती असे म्हणता येणार नाही. त्यांच्या मनावर झालेले संस्कार हे रूढी परंपरेला धरूनच होते. स्त्री वर्गाविषयी समाजाचे सर्व थर अनुदान होते. स्त्री संपूर्ण परवश होती. प्रत्येक व्यक्तीला व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा मिळाली पाहिजे हा विचार त्याकाळी केला जात नव्हता. विक्षिप्त, गुलामगिरीचे, पराधीनतेचे जीवन जगणे स्त्रियांना वावगे वाटत नव्हते. कारण तत्कालीन कालखंडात तशी रुढी होती. बायकांनी असे ज्वार भिंतीआड वावरावे असा जगन्मान्य व्यवहार होता.कशा पद्धतीने वागावे अशा तऱ्हेचे शिक्षण एक पिढी दुसऱ्या पिढीला देत होती. शिवकालात आणि पेशवाईत बालविवाह होत. विवाह धार्मिक विधी असल्याने आईबाप तो मुलांच्या हिताकरिता ती अज्ञान असताना उरकवून घेत. विषम विवाह त्याकाळी श्रीमंत तसेच सामान्य पुरुषांचे होत. युद्धात जिंकलेल्या स्त्रिया दासी म्हणून पळून नेल्या जात असत. युगप्रवर्तक शिवाजी या शिवचरित्रात वा. कृ. भावे लिहितात, "परकीय मुलुखात स्वारी करून तो प्रदेश जिंकणारे सैनिक मुसलमान असो, रजपूत असो, नाहीतर मराठे असो, विजयाच्या उन्मादात स्त्रियांवर अत्याचार करणे ते आपला अधिकार समजत."[६] धर्माच्या नावावर स्त्रियांच्या मनावर निष्ठेचा संस्कार केला जाई. त्यामुळे विधवा पुनर्विवाहाचा विचारही पापमय समजला जात असे. व्रतस्थ संन्यासिनीचे आयुष्य तिच्यासाठी सक्तीचे मानले जात या काळात वडिलोपार्जित मिळकतीत मुलालाच अधिकार असे. पतीच्या मृत्यूनंतर विधवेची स्थिती दयनीय असे.

मराठा कालखंडातील कर्तबगार महिलांचे कार्य -

प्राचीन राजवटीपासून स्त्रियांनी राजकारणात लक्ष घालण्याची किंवा राज्यारूढ झालेला राजा अज्ञान असल्यास त्याची माता म्हणून राज्यकारभार पाहण्याची प्रथा महाराष्ट्रात रूढ होती. त्या फक्त वीरमाता, वीरपत्नीच होत्या की विरांगणा म्हणून रणांगणात उतरत होत्या आणि साऱ्या भूमिका पार पाडीत असताना त्यांना कोणते राजकीय हक्क प्राप्त झालेले होते हे पाहणे जरूर ठरते. महाराष्ट्रात जिजामातेने तेजस्वी स्त्री जीवनाची परंपरा निर्माण केली. शहाजी राजांनी जिजामातेवर पुण्याची जबाबदारी सोपविली होती. पुण्याचा विकास, राज्यकारभार हुशारीने, शेतकऱ्यांना मदत करणे, तंटे सोडवणे यांसारख्या जबाबदाऱ्या त्या सक्षमपणे पार पाडत होत्या. मोठ्या आणि धैर्याने राज्यकारभार सांभाळत होत्या. महाराजांच्या खलबतांमध्ये स्वतः जातीने लक्ष घालत असत. राजमाता जिजाबाई यांच्या कर्तृत्वाबद्दल प्रसिद्ध झालेली अनेक पत्रे सार रूपाने पत्रसारसंग्रह या द्विखंडात्मक भारत इतिहास संशोधन मंडळ प्रकाशनात पहावयास मिळतात. त्यात शिवाजी महाराजांच्या गैरहजेरीत जिजाबाई तंटे सोडवत. शिवाजी राजांच्या निर्णयामुळे कारभारात अनपेक्षितपणे अडचण निर्माण झाल्यास त्या दूर करीत असत. इ. उल्लेख पहावयास मिळतात.

राजारामाची पत्नी महाराणी ताराबाई देखील कर्तृत्ववान होती. छत्रपतींचे सेनापती हंबीरराव मोहिते यांची कन्या म्हणजे महाराणी ताराबाई होय. पतीच्या निधनानंतर १७०० ते १७०७ या कालखंडात बादशहा औरंगजेबापासून महाराणी ताराबाईंनी मराठ्यांच्या स्वातंत्र्याचे रक्षण केले. याबरोबरच अत्यंत कार्यक्षमतेने राज्यकारभारही केला. इतिहासकार खाफीखानच्या मते, "ताराबाई हिने आपल्या तीन वर्षाच्या मुलाला राजारामाच्या गादीवर बसविले. तिने सर्व कारभार हाती घेतला. सरदारांच्या नेमणुका, त्यांच्या बदल्या, राज्याचा कारभार, बादशाही मुलुखावरील हल्ले हे तिच्या तंत्राने चालू झाले."[७] मराठा साम्राज्यातील संघर्ष आणि अस्थिरतेच्या काळात त्यांच्या नेतृत्वासाठी त्या ओळखल्या जातात. राजाराम महाराजांच्या निधनानंतर राज्यकारभाराची सर्व सूत्रे हाती घेऊन ताराबाईंनी मुघल फौजांना मागे सारण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली. त्या स्वतः लष्करापुढे येऊन लष्कराचा आत्मविश्वास वाढवित. मराठ्यांची खालावलेली आर्थिक स्थिती उंचावण्यासाठी त्यांनी मुघली मुलुखांवर स्वाऱ्या करून चौथाई व सरदेशमुखी गोळा करून राज्याचे आर्थिक बळ वाढविले. कवी गोविंद यांनी महाराणी ताराबाईंच्या पराक्रमाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

"दिल्ली झाली दीनवाणी। दिल्लीशाचे गेले पाणी।

महाराणी ताराबाई रामराणी। भद्रकाली कोपली।."[८]

अंगी नेतृत्वाचे गुण असलेल्या मराठा स्त्रियांच्या परंपरेत अहिल्याबाई होळकर यांचे नाव अग्रगण्य आहे. अहिल्याबाई होळकरांनी आपल्या कारकिर्दीत शत्रू व विरोधकांना तोंड दिले. राघोबादादांनी अहिल्याबाई यांचे राज्य मोडून काढण्याचा कट केला तो अहिल्याबाईंनी मोडून काढला. बंडखोरांना चिरडून प्रजेचे रक्षण करून तिने महिलांचेही सैन्य उभारले. तसेच नर्मदा तटावर महेश्वर येथे नवीन राजधानी उभारली. अहिल्याबाई ही एक धैर्यशाली व कुशल प्रशासक होती. याशिवाय अहिल्याबाईंनी जनकल्याणाची अनेक कामे केली.

संभाजी राजांची पत्नी महाराणी येसूबाई यांच्यामध्येही धैर्य आणि समयसूचकता हे गुण होते. स्त्रियांच्या कर्तृत्वगुणांमध्ये त्यांच्या नेतृत्वगुणांचा आणि विशेषतः लष्करी नेतृत्वाचा बराच मोठा भाग होता. परंतु यातील काही स्त्रियांचे कर्तृत्व पती निधनानंतर दिसून आले. मराठेशाहीच्या इतिहासात ज्या काही लढवय्या स्त्रियांची नावे आढळतात, त्यात उमाबाई दाभाडे यांचे नाव महत्त्वाचे दिसून येते. पेशव्यांच्या राजकारणात दर्याबाई भोसले यांचे नाव बारभाईंच्या संदर्भात वाचायला मिळते. 18 व्या शतकाच्या उत्तरार्धातील मराठे शाहीतील एक घटना 'शिंदे बायांचे बंड' या नावाने प्रसिद्ध आहे. या बंडाची म्होरकी बाई लक्ष्मीबाई शिंदे ही पेशवाईतले प्रसिद्ध मराठा सरदार महादजी शिंदे यांची थोरली पत्नी होती. अशा तऱ्हेने राजकारणात लक्ष घालून धीराच्या गोष्टी सांगणे, सल्ला देणे, प्रसंगी रणांगणावरही आपल्या शौर्याचा दाखला देणे अशा तऱ्हेची कामगिरी वडीलकीच्या नात्याने जिजामातेपासून पेशवाई अखेर अनेक स्त्रिया करीत होत्या. या उलाढालींमागे त्यांच्या मुळाशी राज्याची कल्पना

होती. स्वराज्य याचा अर्थ राज्याच्या अंमलाखालील प्रदेश असाच होता. आपले छोटेसे संस्थान, आपली जहागीर, त्याविषयीची आपली जबाबदारी आणि त्याच्या संरक्षणासाठी प्रसंगी प्राणप्रणाने झुंज देणे यात सर्वांची इतिश्री होत होती.

स्वयंनिर्णय, सत्ताभिलाष, यात स्त्रियाही कमी पडत नव्हत्या. पती निधनानंतर स्वपुत्र किंवा दत्तक वयात येईपर्यंत गादीची, राज्याची व शासनाची धुरा त्यांच्या हाती येई. अशा तऱ्हेने राजकारण करण्याची संधी मिळालेल्या स्त्रियांनी आपल्या अवधीतला राज्यकारभार तत्कालीन राजकारणाच्या कल्पनेप्रमाणे कुशलतेने चालविला होता. परंतु खेदाची गोष्ट अशी की, सतराव्या आणि अठराव्या शतकातील राजकारणाच्या प्रांगणातील स्त्रीची भूमिका कितीही भव्य असली तरी ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने ती दुय्यम दर्जाची होती. कारण त्यांच्या कर्तृत्वाची प्रतिष्ठा त्यांच्या संबंधित पुरुषावर अवलंबून असे. एका अर्थाने एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्त्रीला सामाजिक प्रतिष्ठा असण्याचा तो काळच नव्हता. शाहिरांनी जरी तिच्या कर्तृत्वाचे पोवाडे गायले तरीही कविवर्य भा.रा.तांबे यांच्या कवितेतून 'जन कसे तुडविती तुज चरणी' यातून स्त्री जीवनातले एक दारुण सत्य अत्यंत खेदाने वर्णन केलेले दिसून येते.

निष्कर्ष -

1) सुलतानशाही, मुघल व मराठा कालखंडातील स्त्री जीवन दुय्यम दर्जाचे होते.
2) मध्ययुगीन कालखंडातील स्त्रियांनी राजकीय, सामाजिक व प्रशासकीय पातळीवर मोलाचे योगदान दिलेले होते.
3) मध्ययुगीन भारतातील स्त्रियांच्या कामगिरीवरून त्यांच्या कार्यकर्तृत्वाला एक अवकाश मिळालेला दिसून येतो.
4) मध्ययुगीन भारतातील कर्तबगार महिलांचे कार्य अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे.

संदर्भ टीपा -

1) एस. क्षीरसागर, मध्ययुगीन भारत, मोगल साम्राज्य खंड दोन, के सागर पब्लिकेशन्स, पुणे, तृतीयावृत्ती,२०१२.पृ.१५.
2) शं. गो. कोलारकर, भारताचा इतिहास प्राचीन व मध्ययुगीन, श्री मंगेश प्रकाशन, द्वितीयावृत्ती, २००१, पृ.१९८
3) सतीशचंद्र, मध्यकालीन भारत, ओरिएंट ब्लैकसा न प्रा. लिमिटेड, प्रथम संस्करण, २००९, पृ.३१२.
4) शारदा देशमुख, शिवकालातील व पेशवाईतील स्त्री जीवन, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, प्रथमावृत्ती,१८७३,पृ.२०४.
5) वा. कृ.भावे, युगप्रवर्तक शिवाजी महाराज, पुणे,१९५५, पृ.३१३.
6) अप्पासाहेब पवार, (संपा.), ताराबाईकालीन कागदपत्रे खंड तिसरा, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, १९७२, पृ.६५.
7) इंदुमती शेवडे, स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा संत कवयित्री, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८९. पृ.३५.
8) सोमनाथ रोडे, मराठ्यांचा इतिहास, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिकेशन्स, पहिली आवृत्ती १९९८. पृ. पृ. ७५.